# आपत्तीच्या काळी विविध खात्याकडून

# पार पाडावयाच्या जबाबदा-या

## प्रमाणित कार्य पध्दती

## (Standard Operating Procedure)

## महसूल खाते :

1) जिल्हाधिकारी
२) अतिरिक्त जिल्हाधिकारी
३) निवासी उप जिल्हाधिकारी
४) उप जिल्हाधिकारी
५) उपविभागीय जिल्हाधिकारी
6) तहसिलदार
७) नायब तहसिलदार
८) मंडल अधिकारी
9) तलाठी

## तहसिलदार यांच्या जबाबदा-या

आपत्तीपूर्वी व आपत्तीच्या वेळी तहसिलदार यांनी खालील जबाबदऱ्या पार पाडणे आवश्यक आहे.

## तालुका नियंत्रण कक्षाची स्थापना करणे :

- तालुका नियंत्रण कक्षाची स्थापना करताना,त्यामध्ये खालील गोष्टींचा अंतर्भाव करणे आवश्यक आहे.
- तालुका नियंत्रण कक्षाशी दूरध्वनीद्वारे थेट संपर्क
- नायब तहसिलदार दर्जाचाअधिकारी नियंत्रण कक्षाचा प्रमुख असावा.
- आवश्यक असणा-या वस्तु खालीलप्रमाणे तयार ठेवाव्यात.बोटी,ट्रक,पाण्यामध्ये वापरता येणा-या बॅट-या,रात्री वापरता येणा-या बॅट-या,खाणकामासाठी आवश्यक असणारे साहित्य,जाड स्वरुपाचे दोर,झाडे कापण्याच्या करवती,मेगा फोन,गॅस कटर्स,जे.सी.बी. कटर्स,जनरेटर्स,एल.पी.जी.,प्रथमोपचाराचे साहित्य .
- तालुक्याचा तहसिलदार याने तालुक्यामधील विविध खात्यांच्या कामकाजामध्ये समन्वय राखण्याची जबाबदारी पार पाडावी.तसेच त्याने खात्यांना आवश्यक ती मदत तात्काळ पुरवावी.जेणेकरुन त्यांना पूर्ण क्षमतेने काम करता येईल.
- घटनास्थळावरुन तहसीलदार यांनी जिल्हा नियंत्रण कक्षाशी व खालील अधिका-यांशी कायमस्वरुपी संपर्कात असणे आवश्यक आहे.

१) पोलीस (कायदा व सुव्यवस्था) - पोलीस निरीक्षक

२) अग्निशमन दल - मुख्य अधिकारी

३) एस.टी.(वाहतुक) - मुख्य वाहतूक अधिकारी

४) सरकारी दवाखाना - वैद्यकीय अधिकारी व प्राथमिक आरोग्य केंद्र

५) बी.एस.एन.एल.- एक्स्चेंज

- आपत्तीकालीन परिस्थितीमध्ये काम करणारे कर्मचारी व स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांना सहजरित्या ओळखता यावे म्हणून त्यांना विशिष्ठ खूण असणारे बॅचेस देण्यात आल्याची तहसीलदार यांनी खात्री करणे आवश्यक आहे.तसेच तालुका स्तरावरील आपत्कालीन आराखडयामधील सर्व माहिती इतर सर्व खात्यांच्या क्षेत्रीय स्तरावर काम करणा-या अधिका-यांना देण्याची जबाबदारी तहसिलदार यांची आहे.

**खाजगी जबाबदारी पार पाडण्याची जबाबदारी पूर्णपणे तहसिलदार यांची आहे.**

- घरांची पडझड झाल्यास त्यामध्ये अडकलेल्या लोकांना पोलीस,स्वयंसेवी संस्था व अग्निशामन दलाच्या मदतीने सुरक्षितरित्या बाहेर काढणे.
- जखमी व्यक्तींना तात्काळ रुग्णालयामध्ये पोहोचवण्याची व्यवस्था करणे.
- मृतदेह रुग्णालयामधील शवागारामध्ये पोहोचवण्याची व्यवस्था करणे.
- पूर परिस्थिती आटोक्यात आणण्याचे प्रयत्न करणे.
- दरड कोसळल्यास उद्भवणा-या परिस्थितीवर नियंत्रण करणे.
- रस्त्यावर पडलेल्या झाडांची विल्हेवाट लावून,वाहतूक सुरळीत करणे.
- खराब रस्त्यांची दुरुस्ती तसेच पाईपलाईन व गटारांची दुरुस्ती करणे

**तहसिलदार त्यांनी खालील बाबी उपलब्ध करुन देणे व समन्वय करण्याची व्यवस्था करावी :**

- बाधित व्यक्तींचे एस.टी., ट्रॅक्स अथवा खाजगी वाहनांमधून स्थानांतर करणे.
- तात्पुरत्या निवा-याची अन्न व पाण्याची व्यवस्था करणे.
- मदत कार्यामध्ये सहभागी असणारी वाहने ओळखता येण्यासाठी त्यांना पासेस अथवा स्टिकर्स देण्याची व्यवस्था करणे.
- घटनास्थळी इत्यंभूत माहिती देण्यासाठी माहिती केंद्राची उभारणी करणे.
- आवश्यकता भासल्यास खाजगी वाहने अधिग्रहीत करणे व मागणी प्रमाणे तात्पुरत्या निवा-याची व्यवस्था करणे.

**आपत्ती पुर्व नियोजन :**

- आपआपल्या विभागवार आपत्ती व्यवस्थापन समित्यांची बैठक घेऊन आपत्ती निवारण्यासाठी नियोजन करावे.
- जिल्हा आपत्ती व्यवस्थापन आराखडा / तालुका आपत्ती व्यवस्थापन आराखडा / गांव आपत्ती व्यवस्थापन आराखडातयार करणे,या आराखड्याचे वर्षातून दोनदा अद्यवतीकरण करणे.

- आपल्या विभागातील संपर्क यंत्रणा सज्ज ठेवणे.तसेच,आपल्या संपर्क यंत्रणा बिघडल्यास त्यास पर्यायी यंत्रणा तयार ठेवणे
- आपआपल्या क्षेत्रात आपत्तीच्या काळात लोकांना हलविण्यासाठी निवा-याची व्यवस्था करुन ठेवणे.
  - नियंत्रण कक्षाची तपशिलबार व्यवस्था करावी.नियंत्रण कक्ष 24 x 7 मध्ये सुरु ठेवावे.मदत आणि सोडवणुक कार्यासाठी आवश्यक पडणारे साहित्य जमा करुन ठेवणे उदा- मोणबत्ती,बॅटरी,लोईफ जॅकेट,लाईज रिंग्ज (गाडीचे टयुब) पेट्रोमॅक्स,100 मी.दोर,सर्च लाईट, विविध करवती, मेगाफोन इत्यादी, आपत्ती काळात लागणा-या जड संसाधनाची उपलब्धता आपल्या परिसरात कोठे आहे, याची यादी करुन ठेवावी.उदा.जे.सी.बी.,पोकलँड,ट्रक,बोटी,जनरेटर इत्यादी.
  - जिल्हा/तालुका/गावांंचे नकाशे नियंत्रण कक्षात ठेवावेत.तसेच,संपर्क यंत्रणा अद्यावत ठेवावी.
  - स्वयंसेवी संस्था आणि त्यांचे मदतनीस यांचे पत्त आणि दूरध्वनी क्रमांक दर्शनीय भागात लावावेत.

**आपत्ती सूचना मिळताच:**

आपत्तीची सूचना मिळताच / जिल्हा / तालुका /गाव पातळीवर अधिकारी यांस त्यांच्या मुख्यालयाच्या जागेवर राहण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

- विविध विभागाच्या अधिका-यांचे तयार केलेल्य गटास नियोजनानुसार कार्य करण्यास पाचारण करणे.

१) **आपत्तीच्या काळात - (महसूल )**

- मंत्रालय नियंत्रण कक्ष विभागीय आयुक्त, सचिव मदत आणि पुनर्वसन विभाग, मुख्य सचिव, पालक मंत्री यांना आपत्ती विषयक कल्पना देणे
- आपत्तीच्या काळात महसूल खाते अग्निशमन/होमगार्ड/पोलिस खाते यांच्या मदतीने सोडवणूकीचे (Rescue Operation) कार्य करेल
- पूर्व सूचना संदेश प्रणाली : एम डिझास्टर संकल्पनेअंतर्गत जिल्ह्यातील पूर बाधीत एकुण 89 गावातील सरपंच, ग्राम पंचायत सदस्य पाच गटातील सदस्य, अत्यावश्यक शासकीय यंत्रणेतील खातेप्रमुख,अधिकारी यांचे नाव व मोबाईल क्रमांकासह एस.एम.एस. ब्लास्टर सिस्टीममध्ये जिल्हा नियंत्रण कक्षाशी जोडण्यात आली आहे.या द्वारे संबधित तालुक्यातील गावातील लोकांना त्वरीत संदेश पाठवून पुढील कार्यवाहीविषयी पूर्ण सुचना दिली जाते.जेणे करुन पुढील अनर्थ टाळण्यासाठी लोकांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सतर्क राहण्याच्या सुचना दिल्या जातात.कमीत कमी खर्चा मध्ये क्षणात एकाच वेळी अनेक लोकांना त्वरीत संंपर्क साधता येणे हे सिटीमचे प्रामुख्याने वैशिष्ट्य ठरते.
- सबंधित भागाचा नकाशा आपल्या सोबत ठेवणे.

- जखमींना उपचारांसाठी हलविण्यासाठी वाहनांची व्यवस्था प्राधान्याने करणे.तसेच,मृत व्यक्ती आणि जखमींना हलविण्यासाठी व्यवस्था करणे.यासाठी एस.टी.महामंडळाच्या बसेस,शासकीय वाहने आणि खाजगी वाहनांचा वापर केला जाईल.
- अतिसंवेदनाशील भागात लाऊडस्पिकर असलेल्या वाहनांवरुन दक्षतेचा इशारा दिला जाईल .
- जनजिचप सुरळीत होण्यासाठी दळणवळण व्यवस्था पूर्ववत करणे.
- लोकांची सोडवणूक करुन त्यांचे स्थलांतर करावे.तसेच तात्पुरता निवारा आणि अन्नधान्याची व्यवस्था करावी.
- लोकांना माहिती मिळवण्यासाठी माहिती केंद्रीत स्थापना करणे.
- खाजगगी वाहनांचे अधिग्रहण जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत केले जाईल.
- महसूल यंत्रणेमार्फत आरोग्य विभागाच्या मदतीने साथीचे रोग पसरणारा नाहीत यासाठी उपाय योजना करावी.
- जिल्ह्यात झालेल्या कृषी नुकसानीचे कृषी विभागाशी संयुक्त गटामार्फत पंचायत करणे.
- अन्न,पाणी यांचे निरक्षण करुन त्यांचे वितरण केले जाईल.
- कपडे,शिधा,(सुके धान्य) यांचे वाटप करणे.तसेच स्वयंपाकासाठी आवश्यक वस्तुंची उपलब्धता करणे.
- सानुग्रह अनुदानाचे वाटप करणे.
- आपत्तीच्या स्वरुपाविषयी (विशालते) माहिती घेण्यासाठी लोकप्रतिनीधींशी संपर्क साधणे.
- रात्री आपत्ती आल्यास आपल्यासोबत बॅटरी (टॉर्च) घेणे,पूर आपत्ती असल्यास सोबत रस्सी, दोरी घेऊन जोणे,मत्स्य व्यवसाय अधिकारी यांना बोट व्यवस्थेसाठी कळवणे,पुराची तीव्रता अधिक असल्यास सेनेस पाचारण करणे.
- दरड कोसळली असल्यास जे.सी.बी./पोलकँडची व्यवस्था करण्यासाठी सा.बां.वि.कळवणे.
- मदत कर्यसाठी आवश्यक आहे त्या उपकरणांची व्यवस्था करणे.
- राज्य / जिल्हा/ उपविभाग / तालुका तेथील नियंत्रण कक्षांना माहिती देणे आणि घेणे.

## २) पोलीस खाते :

१) विशेष पोलीस माहानिरीक्षक
२) पोलीस अधिक्षक
३) अप्पर पोलीस अधिक्षक
४) पोलीस उपअधिक्षक
५) उप विभागीय पोलीस अधिकारी (सर्व)
६) पोलीस उपअधिक्षक

७) पोलीस निरीक्षक
८) पोलीस उपनिरीक्षक
९) पोलीस पाटील

**पोलीस खाते हे महसूल खात्यास व पुढील उपक्रमात खालील प्रकारे समन्वय साधेल**

**पोलीस निरीक्षक यांच्या जबाबदा-या :**

आपत्ती पूर्वी व आपत्तीच्या वेळी पोलिस निरीक्षक यांना खालील जबादा-या पार पाडणे आवश्यक आहे.

- जखमी लोकांना प्राधान्याने रुग्णालयामध्ये हलवेणे,तसेच रुग्णालयाच्या ठिकाणी जमावाला नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलीस बंदोबस्त नियंत्रणात ठेवणे
- बाधीत झालेल्या भागामध्ये बघेलोक, वाहने, इ.वर नियंत्रण ठेवणे.
- बाधीत झालेल्या भागा मध्ये स्थावर मालमत्ता तसेच मौल्यवान गोष्टीवर देखरेघ करणे.
- बाधीत व्यक्ति व त्यांची वाहतूक करणारी वाहने यांची रहदारी सुरळीत करुन ठेवणे.
- पोलीस विभागाच्या पध्दतीप्रमाणे पंचनामे करणे
- बस स्टँड, शाळा, इत्यादी सार्वजनिक गर्दीच्या ठिकाणी जमाव नियंत्रण करणे,तसेच या ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवणे
- बाधित भागामध्ये नियमित पणे गस्त घालणे.
- सुरक्षित व्यवस्था करणे,तसेच बाधित लोकांना पोलीस वाहन,तसेच खाजगी वाहनांच्या मदतीने सुरक्षीत ठिकाणी हलवणे
- कायदा व सुव्यवस्था राखणे
- जनतेची माहिती होण्याच्या दृष्टीने यंत्रणा उभी करणे, त्यासाठी चिन्हंाकित तक्त्यांचा वापर करुन बाधित क्षेत्राची माहिती देण्यात यावी.
- शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच अफवा पसरु नयेत,यासाठी आपत्ती व्यवस्थावन गटाची मदत घेण्यात यावी
- प्रसार माध्यमांना आणि नागरिकांना माहिती देण्यासाठी माहिती केंद्राचे आयोजन करण्यात यावे
- बाधीत श्रेत्रामध्ये घडणा-या, तसेच नेमणूक करण्यात आलेल्या कर्मचा-यांवीषयी पोलिस नियंत्रण कक्षास माहिती देण्यात यावी व अतिरिक्त मदती बाबात कळविण्यात यावे.
- पोलिस निरीक्षक (वाहतूक) यांच्या जबाबदा-या पार पाडणे आवश्यक आहे.
- वाहतूक नियंत्रण व निरीक्षण करणे
- बस स्थानक व शाळा इत्यादी प्रमुख ठिकाणी गस्त घालेणे.
- आवश्यक्ता भासेल तिथे पर्यायी मार्गने वाहतूक व्यवस्था करणे
- अरुं द रस्ते,जास्त रहदारीचे रस्ते या ठिकाणी वाहतुकीची स्थिती दर्शवणारी माहिती ठिकठिकाणी देणे .
- आवश्यकते नुसार जादा बसेसची व्यवस्था एस.टी. च्या मदतीने करणे .

- रस्त्यावर अडथळा ठरणारी वाहने इत्यादी क्रेनच्या मदतीने रस्त्यावरुन बाजूला घेणे व वाहतूक सुरळीत करणे

वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी एन.सी.सी.,एन.एस.एस.,आर.एस.पी.स्वयंसेवी संघटना इत्यादींची मदत घेणे.

- बाधित लोकांना पोलिस वाहन,तसेच खाजगी वाहनंाच्या मदतीने स्थलंातरित करण्याची व्यवस्था करणे.
- पोलिस नियंत्रण कक्षास माहिती देणे व अतिरिक्त मदती बाबत कळविणे.

**आपत्तीच्या काळात**

- दर दोन तासांनी पोलिस नियंत्रण कक्षाने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियंत्रण कक्षास आपणाकडील माहिती द्यावी
- आपल्याकडील एका अधिका-याची 24 X 7 आपत्तीच्या काळात नियंत्रण कक्षात नेमणूक करावी.
- आपत्तीच्या काळात जखमींना प्राधान्याने दवाखान्यात / इस्पितळात हलविले जात असताना गर्दी आडविण्याचे कार्य आणि बंदोबस्ताचे कार्य पोलीस प्रशासनामार्फत केले जाईल.
- आपत्तीच्या ठिकाणी बघ्यांची गर्दी नियंत्रण करणे,गाड्यांची गर्दी नियंत्रित करणे,वातुकीची व्यवस्था लावणे.
- आपत्तीग्रस्त भागातील संपत्ती आणि मौल्यवान वस्तूंचे रक्षण करणे.
- मृतांची योग्य ओळख करुन त्यांनी व्यवस्थीत विल्हेवाट लावणे.
- मदतीस आणि सोडवणुकीस सहजपणे जात येईल अशी व्यवस्था निर्माण करणे.
- पोलिसांच्या पद्धतीनुसार पंचनामा करणे.
- रेल्वे स्टेशन,बस स्टॅड यांच्या नियंत्रण, बंदोबस्त ठेवणे.
- आपत्ती ग्रस्त भागांची सातत्याने पाहणी करणे.
- कायदा आणि सुव्यवस्था काबुत आणि समाज विघातक प्रवृत्तींना नियंत्रणात ठेवणे.
- आपात्कालीन साहित्यांचे (मदत) वाहतुक करण्यासाठी सुरक्षितता देईल.
- लोकंाना व्यक्तिगत माहिती मार्गदर्शन करणे.
- एन.एस.एस./एन.वाय.के.एस./आर.एस.पी.यांच्या माध्यमातून ट्रॅफ्ि कचे नियंत्रण करणे.

## 3)अग्निशमन विभाग

### अग्निशमन दल अधिकारी यांच्या जबाबदाऱ्या

आपत्ती व आपत्तीच्या वेळी अग्निशमन दल अधिकारी यांनी खालील जबाबदाऱ्या पार पाडणे आवश्यक आहे.

- बाधीत क्षेत्रामध्ये अडकलेल्या लोकंानी सुटका करणे.

- जखमी व्यक्तिंना रु ग्णालयामध्ये स्थलांतरित करण्यास प्राधान्य देणे.
- बाधित क्षेत्रामधून सर्व व्यक्तींचे सुरक्षीत स्थळी स्थलांतर करणे.
- बाधीत क्षेत्रामधील लोकांची विद्युत उपकरणे आणि विद्युत पुरवठा यापासून सुरक्षा करणे.
- रस्त्यावर पडलेल्या झाडांमुळे निर्माण झालेला अडथळा दूर करुन वाहतूक सुरळीत ठेवणे.
- तालुका प्रशासनाशी समन्वय साधून,पडझड झालेल्या घरांमधून लोकांची सूटका करणे.
- बाधीत क्षेत्रामध्ये घडणा-या घडना,तसेच नेमणूक करण्यात आलेल्या कर्मचा-यांविषयी अग्निशमन नियंत्रण कक्षास माहिती देणे व अतिरिक्त मदतीबाबत कळविणे.

# 4)सार्वजनिक बांधकाम विभाग :

१) अधिक्षक अभियंता
२) कार्यकारी अभियंता
३) उपविभगीय अभियंता
४) उप अभियंता
५) शाखा अभियंता
६) कनिष्ठ अभियंता
७) स्थापत्य अभियंता सहाय्यक

**कनिष्ठ अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या जबाबदा-या :**

आपत्तीपूर्वी व आपत्तीच्या वेळी कनिष्ठ अभियंता यांनी खालील जबाबदा-या पार पाडणे आवश्यक आहे.

- आपत्तीच्या वेळी झाड पडणे, दरड कोसळण्यामुळे रहदारीस अडथळा होऊ नये या पूर्वतयारी जे.सी.बी. व झाडे कापण्याच्या करवती तयार ठेवणे.
- आपत्तीच्या वेळी घरांच्या पडझडीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन त्याचे मृत्यू ठरवणे.
- आपत्तीच्या वेळी बाधीत झालेल्या लोकांना राहण्यासाठी तात्पुरते निवारे उभरण्यासाठी तहसिलदार व गट विकास अधिकारी यांना आवश्यक ती मदत करणे.
- बाधीत क्षेत्रामध्ये घडणा-या घटना,तसेच नेमणूक करण्यात आलेल्या क मचा-यांवीषयी संबंधित नियंत्रण कक्षास माहिती देणे व अतिरिक्त मदतीबाबत कळविणे

**आपत्तीच्या काळात**

- दर दोन तासांनी विद्युत नियंत्रण कक्षाने जिल्हाधिकारी कार्यार्लयाच्या नियंत्रण कक्षास आपणकडील माहिती द्यावी.
- विद्युत सेवा पुर्ववत करणे.

- आवश्यकता भासल्यास विद्युत प्रवाह खंडीत करणे.
- आपत्तीग्रस्त भागातील विजेसाठी पर्यायी व्यवस्था करणे
- विद्युत सेवा पूर्ववत करण्यासाठी विविध गट तयार करणे
- अधिक मदतीसाठी तहसिलदारांमाफ त जिल्हा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा
- पाणी पुरवठा योजनेचा विद्युत पुरवठा तातडीने पुर्ववत करावा.
- आपल्याकडील एका अधिकाऱ्याची 24X7 आपत्तीच्या काळात नियंत्रण कक्षात नेमणूक करावी.
- प्रासार माध्यमांशी समन्वय साधणे.

## • जिल्हा परिषद विभाग :

१) मुख्य कार्यकारी अधिकारी
२) उपमुख्य कार्यकारी अधिकारी
३) गट विकास अधिकारी
४) विस्तार अधिकारी
५) ग्रामसेवक

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपात्कालीन परिस्थितीमध्ये आपल्या अधिनस्त असलेले गट विकास अधिकारी ठरवून दिल्याप्रमाणे निरनिराळया जबाबदाऱ्या पार पाडतात,यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

### I गट विकास अधिकारी यांच्या जबाबदाऱ्या:

आपत्तीपूर्वी व आपत्तीच्या वेळी गटविकास अधिकारी यांनी खालील जबाबदाऱ्या पार पाडणे आवश्यक आहे.

- आपत्तीच्या वेळी निर्माण करण्यात येणाऱ्या बाधित व्यक्तींच्या छावण्यांसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तंुची व गरजांची पुर्तता करणे.
- तात्पुरते निवारे उभारणे व वाहनांचे अधिग्रहण करण्याच्या कामामध्ये तहसीलदार यांना मदत करणे.
- बाधित क्षेत्रामध्ये घडणाऱ्या ,तसेच नेमणुक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांविषयी संबंधित नियंत्रण कक्षास माहिती देणे व अतिरिक्त मदतीबाबत कळविणे.

### आपत्तीच्या काळात:

**सार्वजनिक बांधकाम खाते हे महसूल खात्यास पुढिल उपक्रमांत खालीलप्रकारे समन्वय करेल:**

- आपत्तीमुळे निर्माण झालेले रहदारीतील इडथळे दूर करणे आणि रस्ता वाहतुकीस पुन्हा खुला करु न देणे .

- दर दोन तासांनी सार्वजनिक बांधकाम खात्याने निर्माण केलेल्या नियंत्रण कक्षाने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियंत्रण कक्षास आपणाकडील माहिती द्यावी.
- आपल्याकडील एका अधिकाऱ्याची 24X7 आपत्तीच्या काळात नियंत्रण कक्षात नेमणूक करावी

## 5) विद्युत पुरवठा

महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ

१) अधिक्षक अभियंता
२) कार्यकारी अधियंता
३) उप कार्यकारी अभियंता
४) सहाय्यक अभियंता
५) कनिष्ठ अभियंता
6) वायरमन

### कनिष्ठ अभियंता यांच्या जबाबदाऱ्या:

आपत्तीपूर्वी व आपत्तीच्या वेळी कनिष्ठ अभियंता यांनी खलील जबाबदा-या पार पाडणे आवश्यक आहे.

- आवश्यकतेनुसार विद्युत पुरवठा खंडीत करणे
- विद्युत पुरवठा सुरळित करणे
- विद्युत पुरवठयाची पर्यायी व्यवस्था करणे
- तातडीच्या दुरु स्तीसाठी सुसज्ज पथक तयार ठेवणे
- बिघाड झालेल्या मुलभुत विद्युत पुरवठयाबाबतची दुरु स्ती करणे
- विद्युत पुरवठा खंडीत झाल्याबातच्या तक्रारींचे निवारण करणे
- आगीची परिस्थिती संदर्भात अग्निशन दलाशी समन्वय ठेवणे
- तपत्पुरत्या निवारे व छावण्या उभारणे
- अन्न वाटपाची व्यवस्था करणे
- धान्य शिजवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तंूच्या पुरवठयाची व्यवस्था करणे
- कपडयांची व्यवस्था करणे
- स्वयंसेवी संस्था व खाजगी क्षेत्रातील व्यक्तींची निरनिराळया वस्तु व मनुष्य बळासाठी मदत घ्यावी
- बाधित क्षेत्रामध्ये घडणाऱ्या घटना,तसेच नेमणूक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांविषयी जिल्हा नियंत्रण कक्षास माहिती देणे व अतिरिक्त मदतीबाबत कळविणे

### II आरोग्य विभाग

जिल्हा परिषद,पुणे

१) मुख्य कार्यकारी अधिकारी

२) जिल्हा आरोग्य अधिकारी
३) अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी
४) जिल्हा हिवताप अधिक ारी
५) साथरोग वैद्यकीय अधिकारी
६) विस्तार अधिकारी
७) तालुका आरोग्य अधिकारी(प.स)
8) पर्यवेक्षक(पं.स)
९) वैद्यकीय अधिकारी (पा.आ.कें)
१०) आरोग्य सहाय्यक/ सहाय्यिका
११) औषध निर्माता
१२) आरोग्य सेवक/सेविक

**वैद्यकीय अधिकारी यांच्या जबाबदाऱ्या:**

आपत्तीपूर्वी व आपत्तीच्या वेळी वैद्यकीय अघिकारी यांनी खालील जबाबदाऱ्या पार पाडणे आवश्यक

आहे.

- गंभीररित्या जखमी व्यक्तींवर उपचार करण्याची व त्यांना रु ग्णालयामध्ये स्थलांतरीत करण्याची व्यवस्था करणे
- घटनास्थळी व्यक्तींवर उपचार करण्याची वत्यांना रु ग्णालयामध्ये स्थलांतर करण्याची व्यवस्था करणे
- प्रथमोपचार व औषधे यांचा तात्काळ पुरवठा करणे
- शवविच्छेदनाची व मृतदेहांची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करणे
- रक्तपेढीशी समन्वय साधून तात्काळ रक्त उपलब्ध करु न घेणे
- रु ग्णालयामध्ये माहिती केंद्राची उभारणी करणे
- बाधित क्षेत्रामध्ये घडणाऱ्या घटना,तसेच नेमणुक करणात आलेल्या कर्मचाऱ्यांविषयी जिल्हा नियंत्रण कक्षास माहिती देणे व अतिरिक्त मदतीबाबत कळविणे
-

**III जिल्हा शासकीय रु ग्णालय विभाग:**

1) अधिष्ठाता
२) जिल्हा शल्य चिकित्सक
३) निवासी वैद्यकीय अधिकारी (चिकीत्सा)
४) निवासी वैद्यकीय अधिकारी (बाहय संपर्क)
५) सहाय्यक वैद्यकीय अधिकारी (चिकित्सा)
६) वैद्यकीय अधिक्षक (ग्रामीण रु ग्णालय)
७) अधिसेवक (चिकीत्सा)
८) पाठय निर्देशिका

९) सार्वजनिक आरोग्य परिचारिक
10) परिचारका
11) अधिपरिचारिका
१२) सामाजिक कार्यकर्ता
१३) औषध निर्माता

**आपत्तीच्या काळात**

१) उपायात्मक औषधोपचार आणि साथीचे रोग पसरणार नाहीत,यासाठी लोकांना माहिती देणे.
२) लोकांना दिंल्या जाणाऱ्या अन्न -पाणी यावर नियंत्रण ठेवणे.तसेच घाण आणि स्वच्छता या बाबींची कळजी घेणे.सदर कामी स्वयंसेवी संस्था आणि खाजगी व्यक्ती यांची मदत घ्यावी.
३) कर्मचारी,औषधे इत्यादींच्या अधिक मदतीसाठी तहसीलदारांमाफ र्त आरोग्य अधिकारी जिल्हा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा.
४) जखमींवर आणि अतिसंवेदनशील व्यक्तींवर इस्पितळात औषधोपचार करणे.
५) आपत्तीग्रस्त भागात प्रथमोपचार व औषधांचा पुरवठा करणे.
६) हॉस्पिटलमध्ये माहिती केंद्राची निर्मिती करणे.
७) जिल्हा नियंत्रण कक्षाशी संपर्क ठेवणे.
८) कोणत्याही आपत्तीत विशेष:ता पुराच्या आपत्तीत पिण्याचे पाणी योग्य आहे किंवा नाही या विषयावर तपासणी करणे.
९) घरोघरी जाऊ न शुध्द पाणी कसे करावे, तसेच समुपदेश करावे. तसेच,तापाने किंवा इतर संसर्गजन्य रोगाने आजारी लोकांची ओळख करु न त्यांच्यावर उपचार करणे.
10) साथीचे रोग पसरले असल्यास डॉक्टरांचे पथक आणि पॅरामेडीकल कर्मचाऱ्यांचे पथक आणि आवश्यक त्या औषधांसह गावात मुक्कामासाठी पाठविणे.

**7)नगर पालिका प्रशासन विभाग:**

1)मुख्याधिकारी
2) उपमुख्याधिकारी
3)प्रशासन
4)मुख्य लिपीक
5)नगरअभियंता
6)इतिरिक्त नगरअभियंता
7) लेबर ऑफि सर
8)जलअभियंता/सर्व विभागप्रमुख
9) स्वच्छता निरीक्षक/क्षेत्रिय अधिकारी

**नगर पालिका मुख्याधिकारी यांच्या जबाबदाऱ्या:**

आपत्तीपूर्वी व आपत्ती वेळी नगरपालिका मुख्याधिकारी यांनी खालील जबाबदाऱ्या पार पाडणे आवश्यक आहे

- आपत्तीग्रस्त विभागामध्ये अग्निशमन दलाची नेमणूक करणे
- आपत्तीग्रस्त भागामधील लोकांची मदत व सुटका करणे
- आपत्तीग्रस्त भागामधील जखमी व्यक्तींना प्राधान्याने रु ग्णालयामध्ये स्थानांतरीत करण्याची व्यवस्था करणे.
- आपत्तीमुळे निर्माण झालेल्या कच-याची विल्हेवाट लावणे.
- मृत व्यक्ती व मृत जनावरे यांची विल्हेवाट लावणे.
- पाण्याचे स्त्रोत अशुध्द झाले असल्यास,टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे.
- पुराच्या वेळेस शुध्द पिण्याचे पाणी पुरविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे.
- नगरपालिका क्षेत्रामध्ये झाडे पडली असल्यास, तात्काळ उपाययोजना करुन,रस्ता वाहतुकीसाठी खुला करणे.
- बाधित क्षेत्रामध्ये घडणा-या घटना,तसेच नेमणूक करण्यात आलेल्या कर्मचा-यांविषयी जिल्हा नियंत्रण कक्षास माहिती देणे व अतिरिक्त मदती बाबत कळविणे.

**आपत्तीच्या काळात**

- दर दोन तासांनी पालिका नियंत्रण कक्षाने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियंत्रण कक्षास आपणाकडील माहिती द्यावी
- अग्निशमन दल नेमणूक आपत्तीग्रस्त विभागात करणे.
- आपत्तीग्रस्त विभागात लोकांना मदत व सोडवणुकीचे कार्य करणे.
- आपत्तीच्या काळात जखमींना प्राधान्याने दवाखान्यात / इस्पितळात हलविण्यासाठी वाहनांची उपलब्धता करणे.
- आपत्तीमुळे निर्माण झालेल्या घाणीची विल्हेवाट लावणे.
- अधिक मदतीसाठी तहसीदारांमार्फत मुख्याधिकारी यांनी जिल्हा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा.
- मृत व्यक्ती व मृत जनावरे यांची विल्हेवाट लावणे.
- पाण्याचे स्रोत अशुध्द झाले असल्यास टँकरच्या माध्यमाने पेयजलाचा पुरवठा करणे
- पुराच्या वेळेस पाणी पुरवठा योजनेची व्यवस्था करणे.पाण्यात दीड पटीने टीसीएल पावडर टाकणे
- शहरात झाडे पडली असल्यास तातडीने त्यांची विल्हेवाट लावून रस्ता वाहतुकीस मोकळा करणे

# 8)पाटबंधारे:

1) अधिक्षक अभियंता
2) आर्यकारी अभियंता
3)उपविभागीय अभियंता
4) कनिष्ठ अभियंता

5) स्थापत्य अभियंा सहाय्यक
6)वरिष्ठ लिपीक
7) क निष्ठ लिपीक
8) शिपाई

**कनिष्ठ अभियंता पाटबंधारे यांच्या जबाबदाऱ्या:**

आपत्तीपूर्वी व आपत्तीच्या वेळी कनिष्ठ अभियंता पाटबंधारे यांनी खालील जबाबदाऱ्या पाड पाडणे आवश्याक आहे

- आपत्तीची सूचना मिळताच कनिष्ठ अभियंता पाटबंधारे विभाग यांनी सातत्याने धरणाच्या पाणी पातळीवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे
- धरणामध्ये येणाऱ्या पाण्याची व धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याची माहिती तालुका नियंत्रण कक्षास प्रत्येक तासाला कळविणे आवश्यक आहे
- धरणामधून जास्त पाणी सोडणे आवश्यक असल्यास नदी काठच्या गावांना व तालुका नियंत्रण कक्षास तसे कळविणे आवश्यक आहे
- बाधित क्षेत्रामध्ये घडणाऱ्या घटना,तसेच नेमणूक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांविषयी संबं्ाधित नियंत्रण कक्षास माहिती देणे व अतिरिक्त मदतीबाबत कळविणे

**आपत्तीच्या काळात:**

- दर तासाला पाटबंधारे विभागाचे नियंत्रण कक्षाने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियंत्रण कक्षास आपणाकडील माहिती द्यावी
- आपल्याकडील एका अधिकाऱ्याची 24X7 आपत्तीच्या काळात नियंत्रण कक्षात नेमणूक करावी
- धरणांच्या पाण्याची स्थिती विषयी माहिती जिल्हा प्रशासनास देणे
- धरण क्षेत्रात पाऊ स वाढल्यास त्वरीत धरणाचे पुढील क्षेत्रातील गावांना सूचित करणे
- प्रत्येक धरणावर कुशल व परिस्थिती हाताळू शकेल अशा अधिकाऱ्यांची नेमणूक करणे
- धरणासाठी घालून दिलेले पाणी सोडणे इ.वेळापत्रक काटेकोरपणे पाळणे
- आवश्यकता वाटल्यास मा.जिल्हाधिकारी यांचे सहमतीनेच या वेळापत्रकात बदल करणे

# 9)दूरसंचार

(टेलिफोन सेवा)

**भारत दूरसंचार निगम लि. विभागीय अधिकारी यांच्या जबाबदाऱ्या :**

आपत्तीपूर्वी व आपत्तीच्या वेळी भारत दूरसंचार निगम लि.विभागीय अधिकारी यांनी खालील जबाबदा-या पार पाडणे आवश्यक आहे.

- दूरध्वनी संचाच्या दुरुस्तीसाठी अत्यावश्यक पथक तयार ठेवणे.
- दूरध्वनी संपर्क यंत्रणा दुरुस्त करुन,सुव्यवस्थित ठेवणे.
- बाधित क्षेत्रामध्ये घडणा-या,तसेच नेमणूक करण्यात आलेल्या कर्मचा-यांविषयी संबंधित नियंत्रण कक्षास माहिती देणे व अतिरिक्त मदतीबाबत कळविणे.

**आपत्ती काळात -**

- दर दोन तासांनी दूरसंचार नियंत्रण कक्षाने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियंत्रण कक्षास आपणाकडील माहिती द्यावी.
- जिल्हा आपत्ती व धोका नियंत्रण कक्ष येथे महत्वाची भूमिका असणा-यांचे दूरध्वनी कार्यरत आहेत किंवा नाहीत याची पाहणी करणे.दुरध्वनी कार्यरत नसल्यास त्यांची दुरुस्ती करणे.
- दूरसंचार संवा पूर्ववत करणे.
- दूरसंचार सेवा पूर्ववत करण्यासाठी विविध गट तयार ठेवणे.
- अधिक मदतीसाठी तहसीलदारांमार्फत आरोग्य अधिकारी यांनी जिल्हा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा.
- आपल्याकडील एका अधिका-याची 27x7 आपत्ती काळात नियंत्रण कक्षात नेमणूक करावी.

## 10 ) रेल्वे विभाग:

**रेल्वे स्टेशन व्यवस्थापक यांच्या जबाबदाऱ्या :-**

आपत्तीपूर्वी व आपत्तीच्या वेळी रेल्वे स्टेशन व्यवस्थापक यांनी खालील जबबादा-या पार पाडणे आवश्यक आहे.

- दर दोन तासांनी पालिका नियंत्रण कक्षाने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियंत्रण कक्षास आपणाकडील माहिती द्यावी.
- रेल्वे स्टेशन वरील गर्दीचे नियंत्रण रेल्वे पोलीसांमार्फत करणे.
- लोकांना रेल्वे वेळापत्रक,अपघात इ.विषयी योग्य आणि अद्ययावत माहिती देणे.
- लोकांना तात्पुरत्या निवा-यांविषयी माहिती देणे.
- आपत्तीच्या काळात जाखमींना प्राधान्याने दवाखान्यात / इस्पितळात हलविणे.
- आपल्याकडील एकाअधिका-याची 24x7 आपत्तीच्या काळात नेमणूक नियंत्रण कक्षात करावी.
- गाडी स्थानकावर थांबली असल्यास त्या मागील कारणांची उध्दोषणा करणे.
- अपघाताची माहिती देण्यासाठी चैकशी कक्ष उघडणे व स्टेशनवरील प्रवशांसाठी बसेस उपलब्ध करणे.
- प्रवाशांना पैसे परतीची व्यवस्था करणे.
- प्रसार माध्यमांना रेल्वे वाहतूकीसंबधी माहिती देणे.
- स्थानकांवर अडकलेल्या लोकांसाठी जेवण आणि पाण्याची व्यवस्था करणे.

## 11) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एस.टी.) विभाग:

१) विभाग नियंत्रण
२) विभागीय वाहतूक अधिकारी
३) विभागीय वाहतूक अधिक्षक /विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी

४) विभागीय लेखाधिकारी
५) आगार व्यवस्थापक
६) सहायक वाहतुक अधिक्षक
७) वाहतुक नियंत्रक

**एस.टी.व्यवस्थापक /पी.एम.टी.व्यवस्थापक यांच्या जबाबदाऱ्या**

- वाहतुकीसाठी राखीव बसेस तयार ठेवणे
- रेल्वे व्यवस्थापक व पोलीस निरीक्षक वाहतुक यांच्याशी वाहतुक व प्रवाशी याबाबत समन्वय ठेवणे.
- प्रवाशी वाहतुक सुरळीत होण्यासाठी दृष्टीने अतिरिक्त बस उपलब्ध ठेवणे.
- आवश्यकतेनुसार वाहतुकीचे मार्ग बदलणे.
- प्रवाशांना रद्द झालेल्या गाड्या, उशीरा सुटण-या गाड्या व तात्पुरत्या निवाऱ्यांबाबत माहिती देणे.
- बाधित क्षेत्रामध्ये घडणाऱ्या घटना,तसेच नेमणूका करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांविषयी जिल्हा नियंत्रण कक्षास माहिती देणे व अतिरिक्त मदतीबाबत कळविणे.

**आपत्तीच्या काळात :**

- दर दोन तासांनी एस.टी.नियंत्रण कक्षाने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियंत्रण कक्षास आपणाकडील माहिती द्यावी.
- लोकांना स्थलांतरीत करण्यासाठी एस.टी.बसेस जिल्हा प्रशासनास उपलब्ध करुन देणे.
- आवश्यकतेनुसार जादा बसेस सोडणे.
- जिल्हा प्रशासनास अधिक बसेस उपलब्ध करुन देणे.
- जिल्ह्यातील कोणते रस्ते बाधित झाले आहेत, कोणत्या मार्गावर वाहतूक बंद आहे इ. माहिती जिल्हा नियंत्रण कक्षास सातत्याने कळविणे.

## 13) उप प्रादेशिक परिवहन विभाग:

- दर दोन तासांनी नियंत्रण कक्षाने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियंत्रण कक्षास आपणाकडील माहिती द्यावी.
- जिल्हा प्रशासनास वाहतुक संबंधीच्या साधनांची उपलब्धता करुन देणे.
- कोणत्या भागात रस्ते बंद आहेत व कोणते सुरु आहेत याची माहिती जिल्हा नियंत्रण कक्षास कळविणे.

## कृषी विभाग :

१) कृषी विकास अधिकारी
२) जिल्हा कृषी अधिकारी
३) जिल्हा कृषी अधिकारी (वि.घ.यो.)
४) माहिती अधिकारी
५) विस्तार अधिकारी (जिल्हा स्तर)
६) कृषी अधिकारी
७) विस्तार अधिकारी
8) लिपीक

## तालुका कृषी अधिकारी यांच्या जबाबदा-या

**आपत्तीपूर्वी वआपत्तीच्या वेळी तालुका कृषी अधिकारी यांना खालील जबाबदाऱ्या पार पाडणे आवश्यक आहे.**

- पूर परिस्थितीमध्ये बाधित झालेल्या पिकांचे पंचनामे करुन,नुकसानीचे मूल्य ठरविणे.
- ठरवून दिलेल्या विहीत नमून्यामधील माहिती तहसीलदार यांच्याकडे सादर करणे.
- शेतीच्या नुकसानीचे मोजमाप तहसीलदारांच्या मदतीने पथक तयार करुन करणे.
- अतिवृष्टी झाल्यास अथवा शेती क्षेत्र पूर बाधित झाल्यास त्वरीत अंदाजीत नुकसानीचे मोजमाप करुन जिल्हाधिकारी कार्यालयास कळविणे.

## जिल्हा माहिती कार्यालय विभाग:

**जिल्हा माहिती कार्यालय यांच्या जबाबदाऱ्या:**

- जिल्ह्यातील विविध खात्यातील माहिती प्रसार माध्यमांना देईल.
- प्रसार माध्यमांशी समन्वय साधणे.
- जिल्हा नियंत्रण कक्षाशी सतत संपर्कात राहणे.
- आकाशवाणी, स्थानिक एफ.एम.रेडिओ चॅनल,टिव्ही चॅनल यांच्या मदतीने लोकांना योग्य आणि बरोबर माहितीचा पुरवठा करणे.

**स्वयंसेवी संस्था आणि मित्र मंडळे :**

- आपत्तीच्या काळात स्वयंसेवी संस्था आणि मित्रमंडळे ही अत्यंत महत्वपूर्ण भूमिका पार पाडतात.
- त्यांच्या मदतीने आपणांस मदत आणि सोडवणूक, प्रथमोपचार,माहितीचे वितरण,मृत व्यक्ती आणि जनावरांची विल्हेवाट लावणे,मदतीचे वितरण इत्यादी कार्य करता येतात.
- अशा स्वयंसेवी संस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयाचे सतत संपर्कात राहून सूचनांनुसार बाधित क्षेत्रात जावून काम करावे.

### लोकप्रतिनिधी :

- आपत्तीच्या काळात लोकप्रतिनिधींनी शासकीय यंत्रणा आणि लोक यांच्यात सकारात्मक समन्वय साधावा.
- लोकांना धीर द्यावा.
- स्थानिक संसाधनांचा वापर करुन आपत्तीची तीव्रता कमी करावी.

### **अशासकीय संघटना व स्वयंसेवी संस्था -**

अशासकीय संघटना व स्वयंसेवी संस्था या आपत्कालीन परिस्थितीमध्ये महत्वाची भूमीका बजावू शकतात.तसेचप्रशिक्षीत स्वयंसेवकांचा संच पुरवू शकतात.

आपत्कालीन परिस्थितीमध्ये करण्यात येणा-या कार्यवाहीच्या वेळी,कार्यवाहीमध्ये एकवाक्यता व एकमेकांचे सहकार्य राहण्यासाठी ठरवून देण्यात आलेल्या सूचनांचे व्यवस्थित पालन करणे,माहितीची देवाणघेवाण करणे व तहसीलदारांना संपूर्ण आपत्तीची कल्पना येण्यासाठी तसेच वापरण्यात येत असलेल्या साधन सामुग्रीची व आवश्यक असणा-या साधन सामुग्रीची माहिती होण्यासाठी त्यांना या संघटनांनी वेळोवेळी अहवाल पाठविणे आवश्यक आहे.

### **आपत्तीची सूचना मिळताच अशासकीय संघटना व स्वयंसेवी संस्था यांनी तहसीलदारांसोबत खालील जबाबदार पार पाडणे आवश्यक आहे.**

- शोध व सुटका करण्याची कार्यवाही करणे.
- माहिती मिळवणे.
- प्रथोमपचार करणे.
- मृतदेहाची विल्हेवाट लावणे.
- झालेल्या नुकसानीचे मूल्यमापन करणे.
- माहिती/ सुविधा तात्पुरत्या निवा-याच्या ठिकाणी पुरवणे.
- जमा होणा-या वस्तुंचे व पैशाचे वापर व विनियोग करणे.
- बाधित लोकांना सुरक्षित स्थळी हालवणे,जमावावर नियंत्रण ठेवणे, अफवा पसरु नयेत यासाठी प्रयत्न करणे व वाहतुक व्यवस्था सुरळीत चालू ठेवणे.
- विशेषीकृत सेवा (मानस शास्त्रीय व मनोरुग्ण सेवा सहकार्य) पुरविणे.
- तात्पुरत्या निवा-याची व्यवस्था पाहणे.

### **मदत व पुनर्वसन कार्याशी संस्था संबंधित आहेत -**

- यापैकी बहुतांश संस्थांचा मदत व पुनर्वसन कार्यामध्ये प्रशासनास उपयोग होऊ शकतो.
  १. डिझास्टर मॅनेजमेंट फाऊंडेशन
  २. इंडियन रेड क्रॉस सोसायटी
  ३. रोटरी क्लब
  ४. लायन्स क्लब

५. इंडियम मेडिकल असोसिएशन
६. रोटरी क्लब

या व्यतिरिक्त स्तरावर आपत्तीवेळी उदा.घर पडणे,पूर येणे आशावेळी मोहल्ला कमिटयांची मदत होऊ शकते.अशा मोहल्ले कमिटयांची माहिती घेऊन ठेवणे.तसेच आपत्तीच्या तीव्रतेनुसार खालील संस्था आवश्यक असणा-या वस्तू, उपलब्ध असणा-या वस्तुबाबत नियंत्रण कक्षाच्या माध्यमातून चांगल्या प्रकारे मदत करु शकतात आणि अशासकीय संघटना तालुका स्तरावर, नागरिकांना आपत्तीला सामोरे जाण्यासाठी व त्याबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी मदत करु शकतात.आपत्तीच्या वेळी बाधित होणा-या क्षेत्रासाठी ग्राम पातळीवर आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

## नागरिकांचा सहभाग आवश्यक असणारी क्षेत्रे

### नागरिकांना सहभागी करुन घेण्यासाठी आवश्यक बाबी -

- आपत्तीचा सामाना करण्यासाठी समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींना या प्रक्रियेमध्ये सामावून घेऊन त्यांची मते जाणून घेऊन,त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे.
- समाजाच्या सहभागाची कशाप्रकारे आवश्यकता आहे,ते प्रत्यक्ष संभाषण व चर्चेद्वारे जनतेस समजावून दिल्यास, त्यातून समाजास आपत्तीचा सामना करण्यासाठी प्रेरणा मिळू शकेल.
- या संपूर्ण प्रक्रियेमध्ये नागरिकांशी नियमित संवाद आवश्यक आहे.
- स्थानिक पातळीवर जनतेस निर्णय प्रक्रियेमध्ये सामावून घेणे.
- समाजाचा सहभाग आवश्यक असणारी क्षेत्रे निवडून त्यांची आपत्ती व्यवस्थापन आराखड्यामध्ये नांेद घ्यावी.त्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश असावा.

### स्थानांतर करताना -

- बाधित व्यक्तींचे स्थानांतरण करताना, सुरक्षितता आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींचा,सामाजिक संस्थांचा उपयोग करण्यात यावा.
- संपूर्ण कुटुंबाचे एकत्रितरित्या स्थानांतरण करावे.
- कमी वेळेमध्ये गोंधळ निर्माण न होता, व्यवस्थितरित्या स्थनांतरण तात्काळ होण्याकरिता खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.
- आजारी व गंभीररित्या जखमी व्यक्तींचे स्थानांतरण
- लहान मुले,स्त्रिया व अपंग व्यक्तींचे स्थानांतरण
- वयोवृध्द व्यक्तींचे स्थानांतरण व इतर व्यक्तींचे स्थानांतरण
- परिस्थितीवर लवकरात लवकर मात करता येते.

### स्थानांतरण करताना स्थलांतरितांना खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यास सांगावे

- घरातील सर्व वस्तू सुरक्षित ठेवा.खिडक्या,दारे लावून घराला कुलूप लावा.
- पाण्याचे नळ आणि विद्युत पुरवठा बंद करा.

- बिकट परिस्थितीमध्ये सापडण्याअगोदर तात्काळ बाहेर पडा.
- ठरवून दिलेल्या मार्गाप्रमाणे स्थानांतरण करा, अन्य मार्गांचा वापर करणे धोकादायक ठरु शकेल.
- पुरामध्ये उतरु नका.
- विद्युत वाहक तारांपासून लांब रहा.